**श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर जि.सोलापूर**

**पाहिजेत**

श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिरात तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर खालील पदाची भरती करावयाची आहे. त्यासाठी पात्र व्यक्तीकडून विहीत नमुन्यात दि. ०७/११/२०१६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पद | पद संख्या |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | २ |
| २ | आरोग्य सेवक /सेविका | ४ |
| ३ | पुजारी | १ |
| ४ | गुरू | १ |
| ५ | तारतंत्री | १ |
| ६ | फोटोग्राफर | १ |

अर्जाचा नमुना व नियुक्तीच्या अटी व शर्ती www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या संकेत स्थळावर व तुकाराम भवन पंढरपूर येथे पाहण्यास उपलब्ध आहेत.

क्र.आस्थापना/का.वि./६३५/२०१६ दि. ०१/११/२०१६

सही/—

प्र.कार्यकारी अधिकारी,

संपर्क क्र.: ०२१८६—२२४४६६, २२३५५०

**अर्ज**

दिनांक /११/२०१६

प्रति,
मा. कार्यकारी अधिकारीसो.
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर जि. सोलापूर – ४१३३०४

विषय :– ————————, या मानधन तत्वावरील पदाचे नियुक्तीसाठी अर्ज.

संदर्भ :– दि.०२/११/२०१६ रोजीचे दै. सकाळ, सोलापूर या वर्तमान पत्रातील प्रसिध्द झालेली जाहिरात.

महोदय,

कारणे विनंती अर्ज करतो/करते कि, संदर्भात नमुद जाहिरातीला अनुसरून मी —————————— या पदासाठी अर्ज करीत आहे. मी श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिरात काम करण्यास इच्छूक आहे. सदर कामाचा मला पुरेसा अनुभव आहे. तरी माझ्या अर्जाचा सहानूभूतीपूर्वक विचार करून मला सेवा करण्याची संधी द्यावी ही विनंती.

माझी वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे –

१) पुर्ण नाव(आडनाव प्रथम) ——————————————————————

——————————————————————

२) पूर्ण पत्ता ——————————————————————

——————————————————————

३) मोबाईल क्रमांक ——————————————————————

४) जन्मतारीख व वय दि. / /१९
वय : ——— वर्षे, ———— महिने, ———— दिवस
(दिनांक ०२/११/२०१६ रोजी)
(एस.एस.सी. बोर्ड प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत जोडावी)

५) शैक्षणिक पात्रता ——————————————————————

६) कामाचा अनुभव ——————————————————————
(अनुभवाचा दाखला जोडावा)

७) प्रतिमहा मानधनाची अपेक्षा ——————————————————————

(कृ.पा.प.)

तरी वरील प्रमाणे माझी सर्व माहिती खरी व बरोबर आहे. सदर नियुक्ती बाबतच्या जाहिरातीतील आणि अर्जासोबतच्या अटी व शर्ती मी वाचलेल्या असून त्या मला मान्य आहेत. तरी माझ्या अर्जाचा सहानभूतीपूर्वक विचार करून ---------- या पदावर काम करण्याची संधी मला द्यावी, हि नम्र विनंती.

आपला विश्वासू,

(पूर्ण नांव व स्वाक्षरी)

सोबत खालील कागदपत्राच्या सत्यप्रती जोडल्या आहेत.

१) ------------------------------

२) ------------------------------

३) ------------------------------

४) ------------------------------

५) ------------------------------

## श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर
## अटी व शर्ती (जाहिरात दि.०२/११/२०१६).

१. अर्जदाराचे वय किमान १८ ते ४० वर्षे असावे. जन्मतारखेचा पुरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

२. अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

३. सदर पदावरील पात्र उमेदवारांची निवड संबंधित विभागाचे तज्ञ व मंदिर समिती पदाधिकारी यांचेकडून मुलाखतीद्वारे करण्यात येईल.

४. सदर भरतीसाठी कोणत्याही प्रकारचे आरक्षण लागू नाही.

५. अ.क्र. १ व २ मधील उमेदवारास दि.०८/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा. तुकाराम भवन येथे होणाऱ्या मुलाखतीवेळी आवश्यक ती मुळ कागदपत्रे व त्यांच्या सांक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील. यासाठी उमेदवारांनी वेळेपूर्वी अर्धा तास म्हणजे स. १०.३० वा. हजर असणे आवश्यक आहे. तसेच अ. क्र. ३ ते ६ मधील उमेदवारास मुलाखतीची तारीख व वेळ नंतर कळविली जाईल.

६. आवश्यक शैक्षणिक पात्रता व अनुभव.

| अ. क्र. | पद | शैक्षणिक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | एम.बी.बी.एस. / बी.ए.एम.एस. | संबंधित कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव. |
| २ | आरोग्य सेवक /सेविका | एन. एम. | --//-- |
| ३ | पुजारी | एच.एस.सी. | --//-- |
| ४ | गुरू | वेद शास्त्र संपन्न | --//-- |
| ५ | तारतंत्री | आय.टी.आय. (वायरमन/इलेक्ट्रीशन) | --//-- |
| ६ | फोटोग्राफर | एच.एस.सी. | --//-- |

७. अर्जासोबत आपल्या नावे कोणताही गुन्हा दाखल नसलेबाबत संबंधीत पोलीस स्टेशनचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

८. अर्ज अपूर्ण किंवा त्यासोबतची आवश्यक ती प्रमाणपत्रे न जोडल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.

९. सदरची नियुक्ती एक वर्षाच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर करण्यात येईल. तसेच दर तीन महिन्यानी कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून नियुक्ती पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.

१०.एक वर्ष पुर्ण झालेनंतर कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून नियुक्ती पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.

(कृ.पा.प.)

११.सदर नियुक्तीव्दारे मंदिर समितीकडे कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा कोणताही अधिकार उमेदवारास राहणार नाही.

१२.कामाची वेळ नेमून दिली जाईल त्या वेळेत काम करावे लागेल. तसेच आवश्यक भासेल तेंव्हा जादा वेळ काम करावे लागेल.

१३.काम मध्येच सोडावयाचे असल्यास तशी एक महिना अगोदर नोटीस देणे आवश्यक राहील. अचानक काम सोडता येणार नाही. अचानक काम सोडणेस एक महिन्याचे मानधन जमा करावे लागेल.

१४.फोटोग्राफर पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे स्वत:चा कॅमेरा व व्हिडीओ शुटींग मशीन असणे आवश्यक आहे. तसेच त्याला आवश्यकतेप्रमाणे २४ तासामध्ये केंव्हाही फोटो व व्हिडीओ शुटींग करण्यासाठी हजर व्हावे लागेल.

१५.कामाची प्रगती व वर्तन असमाधानकारक असल्यास तात्काळ कामावरुन कमी करण्याचा अधिकार कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना राहील.

१६.श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरात आपल्या कुटुंबातील व्यक्ती कामाला असल्यास अर्ज करता येणार नाही.

१७.प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची भरती प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित अथवा रद्द करण्याचा अधिकारी मंदिर समितीने राखून ठेवला आहे.

१८.निवड झाल्यास नेमणुकीच्या अटी व शर्ती मान्य असलेबाबत रु.१००/– च्या स्टॅप पेपरवर तहसीलदार यांचे समोर सादर केलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

-----XXX-----